**पोलीस अधीक्षक कार्यालय, पालघर.**

जिल्हा मुख्यालय, कोळगाव, पालघर

दुरध्वनी – ०२५२५ - २५११००

E-mail: - sp.palghar@mahapolice.gmail.com


**प्रेसनोट क्र. २८ दिनांक १७/०६/२०२४**

# पालघर जिल्हा पोलीस शिपाई भरती २०२२-२३ बाबत...

महाराष्ट्र पोलीस शिपाई भरती २०२२-२३ अंतर्गत पालघर जिल्हा पोलीस दलाचे आस्थापनेवर पोलीस शिपाई पदाच्या ५९ रिक्त पदांच्या (३३ पुरुष, १९ महिला पोलीस शिपाई पदे व ७ बँड्समन पदे) जागेसाठी पोलीस भरती पार पडणार आहे. त्याअनुषंगाने एकूण ३५७७ (पुरुष २८२२ व महिला ७५५) उमेदवारांचे आवेदन अर्ज प्राप्त झालेले आहेत. सदरची पोलीस भरती मैदानी चाचणी व लेखी परीक्षा अशा दोन टप्प्यात पार पडणार आहे. सुरुवातीला मैदानी चाचणी पार पडणार आहे.

दि.१९/०६/२०२४ पासून मैदानी चाचणीला सुरुवात होणार आहे. मैदानी चाचणीकरीता पुरुष उमेदवारांसाठी १०० मीटर धावणे, १६०० मीटर धावणे व गोळाफेक असे प्रकार घेण्यात येणार आहेत. तर महिला उमेदवारांसाठी १०० मीटर धावणे, ८०० मीटर धावणे व गोळाफेक असे प्रकार घेण्यात येणार आहेत. **सदर पोलीस भरतीसाठी उमेदवारांचे कागदपत्रे तपासणी, शारीरिक तपासणी व गोळाफेक हे जिल्हा क्रिडा संकुल, दांडेकर कॉलेज जवळ, खारेकुरण रोड, पालघर ता. जि. पालघर येथील मैदानावर होणार आहे. तसेच १६००/८०० मीटर व १०० मीटर धावणे हे प्रकार पोलीस अधीक्षक कार्यालय समोरील मोरेकुरण रोडवर होणार आहे.**

पोलीस भरती २०२२-२३ मध्ये ज्या उमेदवारांनी एकापेक्षा जास्त पदांकरीता अर्ज केले आहेत आणि त्यांची मैदानी चाचणी एकाच दिवशी आली असेल अश्या उमेदवारांना किमान ४ दिवस अंतराने वेगवेगळया तारखा दिल्या जातील. उमेदवारांना काहि अडचण / शंका असल्यास त्यांनी raunak.saraf@mahait.org यावर ईमेल करावा.

जर पावसामुळे एखादे दिवशी मैदानी चाचणी होवु शकली नाही तर त्या संबंधित उमेदवारांना पुढची सुयोग्य तारीख देण्यात येईल.

पोलीस भरतीकरीता येणाऱ्या उमेदवारांची पालघर जिल्हा पोलीस दलाकडून तात्पुरती निवासाची व्यवस्था करण्यात आलेली आहे. महिला उमेदवारांसाठी श्री अंबामाता मंदिर हॉल, पाचबत्ती, पालघर येथे व पुरुष उमेदवारांसाठी लायन्स क्लब, कचेरी रोड, पालघर येथे करण्यात आलेली आहे.

सदरची पोलीस भरती प्रक्रिया निपक्षपातीपणे पार पडणार असून कोणत्याही गैरप्रकाराला यामध्ये थारा असणार नाही. कोणत्याही व्यक्तीकडून ओळखीचे, आमिष दाखवून, पैशाची मागणी करीत असल्यास किंवा आर्थिक गैरव्यवहाराचा संशय आल्यास तात्काळ पोलीस नियंत्रण कक्ष, पालघर दुरध्वनी क्रमांक ०२५२५-२०५३०० तसेच पोलीस उप अधीक्षक (गृह) पालघर यांचे ९७६९८३२४७८ या मोबाईल क्रमांकावर संपर्क साधण्याचे आवाहन पालघर जिल्हा पोलीस दलातर्फे करण्यात येत आहे.

भरती प्रक्रियेकरीता येणाऱ्या सर्व उमेदवारांना पालघर जिल्हा पोलीस दलाकडुन हार्दिक शुभेच्छा !